वाचले :-१) जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड अलिबाग यांच्याकडील पत्र क्र.जिऊअ/कार्या-५/प्रग्रारुजागा/ ९१२७-३०/१३ दिनांक ३/७/२०१३ आणि पत्र दिनांक ०४/१२/२०१३.

२) उपविभागीय अधिकारी माणगांव यांचेकडील पत्र जमीन/कावि-३/ग्रा.रु.तळा/६६४२/ २०१३ दि.०३/१२/२०१३.

३) सहाय्यक संचालक, नगररचना रायगड अलिबाग यांचेकडील पत्र जा.क्र.ससंनर-राअ/ शासकीय जागा मागणी/मौजे तळा/ता.तळा/ग.नं.८६२ व इतर/४५२३ दि.०५/१२/२०१३.

४) तहसिलदार तळा यांचे पत्र क्र.जमीनबाब/कात-५/ग्रा.रुग्णालय/२०१३ दि.३०/११/२०१३.

५) शासन, महसूल व वन विभाग निर्णय क्रमांक जमीन ०५/२०११/प्र.क्र.९०/ज-१ दि.२०/०७/२०११ व शासन, महसूल व वन विभाग परिपत्रक क्र.जमीन ०९/२०१२/प्र.क्र. ७९/ज-१ दि.३०/११/२०१२.

६) शासन, महसूल व वन विभागाकडील परिपत्रक क्रमांक, संकीर्ण ०२/२०११/प्र.क्र.१३/ ई-१, दिनांक २९/०३/२०१२ आणि या कार्यालयाकडील पत्र क्र.मशा /प्रशासन /अ-५/ कम्मांक बसटप/२०१३ दिनांक १४ फेब्रुवारी,२०१३.

७) मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद यांचेकडील पत्र जा.क्र.राजिप/ साप्रशा/ व्हिपी-४/जमीनशिफारस/२०१३ दिनांक ०२/०१/२०१४.

८) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,१९५८ मधील कलम ५१ (१) (१ अ).

९) या कार्यालयाकडील मंजूर टिपणी दिनांक ०४ /०१/२०१४.

---

क्र.मशा/जमीन/अ-३/२२०३६२/२०१४
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड,
अलिबाग, दिनांक:- ०६ /०१/२०१४.

## आदेश

उपोद्घातांत अ.क्र. १ कडे नमुद केलेल्या दिनांक ०३/७/२०१३ च्या पत्रान्वये जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड अलिबाग यांनी तळा, ता.तळा,जि.रायगड येथे ग्रामीण रुग्णालय सुरु करणे करीता २ एकर जागेची मागणी केली आहे. त्या अनुषंगाने उपोद्घातांत अ.क्र.२ कडे नमुद केलेल्या दिनांक ०३/१२/२०१३ च्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी माणगाव यांनी मौजे तळा, ता.तळा, जि.रायगड ग.नं.८६२,८६४,८६५ व ८६६ एकूण क्षेत्र १.१७.०० हे.आर. या ग्रामपंचायत तळे कडे निहित करण्यात आलेल्या जमिनीपैकी ग.नं.८६५ मधील ०.०५.०० हे.आर जागा मसणवटयासाठी ठेऊन उर्वरीत क्षेत्र १.१२.०० हे.आर जमिनीचा प्रस्ताव सादर केला आहे.

उपोद्घातांत अ.क्र. ३ कडे नमुद केलेल्या दिनांक ०५/१२/२०१३ च्या पत्रान्वये सहाय्यक संचालक, नगररचना रायगड अलिबाग असे अभिप्राय दिले आहेत की, मौजे तळा, ता.तळा येथील ग.नं.८६२,८६४,८६५ व ८६६ हे मंजूर रायगड प्रादेशिक योजना नकाशा नुसार शेती या भुवापर विभागामध्ये समाविष्ठ आहे. मंजूर विकास नियमावलीतील नियम क्र. ५(viii) नुसार शेती वापर विभागामध्ये वैदयकीय वापर अनुज्ञेय होत आहे. नियोजित ग्रामिण रुग्णालयाचा समावेश वैदयकीय वापर या संज्ञेत होत असल्याने, सदर जागेत ग्रामिण रुग्णालय अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक ०.५० च्या मर्यादेत अनुज्ञेय होईल. विषयांकीत जागा वितरीत करण्यापुर्वी जागेस किमान १२.० मी.रुंद पोहच मार्ग उपलब्ध होईल याची खातरजमा महसूल विभागाने करणे आवश्यक आहे.

उपोद्घातांत अ.क्र. ४ कडे नमुद केलेल्या दिनांक ३०/११/२०१३ च्या पत्रान्वये तहसिलदार तळा यांनी मौजे तळा ग.नं.८६२,८६४,८६५ व ८६६ एकुण क्षेत्र १.१७.० हे.आर ही जमीन ग्रामपंचायतीकडे वर्ग केलेल्या शासकीय जमिनीपैकी असून ग्रुप ग्रामपंचायत तळाच्या कार्यक्षेत्र प्रस्तावित जागा येते. प्रस्तावित केलेली जमीन ग्रामीण रुग्णालयासाठी योग्य असून प्रस्तावित केलेल्या जागेत जाण्यासाठी सद्यस्थितीत १२.० मी. रुंदीचा रस्ता नाही. परंतु अस्तित्वात असलेला कांक्रेटिकरणाचा ७.० मी. रुंदीचा ग्रामीण रस्ता उपलब्ध असून रस्त्याच्या दोन्ही बाजूला रस्ता रुंदी करणासाठी खुली जागा आहे. त्यामुळे प्रस्तावित केलेली जागा मंजूर होणेस विनंती केली आहे.

(कृ.पु.पा.)

मौजे तळा, ता.तळा ग.नं.८६२,८६४,८६५ व ८६६ पैकी परंपरागत स्मशानभुमीसाठी ०.०५.०० हे.आ. जागा राखून शासकीय अटी शर्तीनुसार ग्रामिण रुग्णालयासाठी ग्रुप ग्रामपंचायत तळे मार्फत हस्तांतरीत करण्यात येत आहे. असा प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येत असल्याबाबत ग्रामसभा ठराव क्र. २५२ (८) दि.०२/१०/२०१३ तसेच ग्रामपंचायत ठराव क्र.६२५ (४) दिनांक २५/१०/२०१३ मंजूर केलेला आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड अलिबाग यांनी त्यांच्याकडील पत्र दिनांक ०४/१२/२०१३ अन्वये असे कळविले आहे की, शासन सार्वजनिक आरोग्य विभागाकडील निर्णय क्रमांक संकिर्ण २०१२/१४१/आरोग्य -३/१३ दिनांक १७/०१/२०१३ अन्वये रायगड जिल्हयातील तळा तालुक्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी नव्याने ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय स्थानेस मान्यता दिली आहे. सदर ग्रामीण रुग्णालय बांधण्याकरीता शासन,सार्वजनिक आरोग्य विभागाकडील निर्णय क्रमांक प्रशामा २०१३/प्र.क्र.२६३/ आरोग्य -३अ दिनांक २४/०६/२०१३ अन्वये मुख्य इमारत बांधकामाच्या अंदाज व आराखडयांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय बांधण्याकरीता शासनाच्या निकषांप्रमाणे किमान ३ एकर जागेची आवश्यकता आहे. प्रस्तुत मुख्य इमारत बांधकामासाठी रु.४५०.०० लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. प्रस्तुत बांधकामासाठी रु.४५०.०० लक्ष इतके अनुदान जुलै-२०१३ च्या पुरवणी अर्थ संकल्पात मंजूर असल्याचे अधिक्षक अभियंता, नवी मुंबई यांनी कळविले आहे. त्यानुसार मौजे तळा ग.नं.८६२,८६४,८६५ व ८६६ एकुण क्षेत्र १.१७.० हे.आर पैकी १ हेक्टर ग्रामीण रुग्णालय तळासाठी शासकीय जागेचा आगाऊ ताबा देण्यात यावा अशी शासनाच्या अटी व शर्ती मान्य असल्याच्या हमीपत्रासह विनंती केली आहे.

बाजारमूल्य दर तक्ता-२०१४ नुसार मौजे तळा, ता.तळा हे गाव प्रभाव क्षेत्रामध्ये असून बिनशेती संभाव्य असलेल्या जमिनीचा जमीन मुल्यांकन दर रु.७७०/- प्रती चौ.मी. दर्शविण्यात आला आहे. त्यामुळे प्रकरणी सदर जमीन मुल्यांकन दर विचारात घेता, जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड अलिबाग यांनी आगाऊ ताबा मिळण्याबाबत विनंती केलेल्या १.००.०० हे.आ. जमिनीचे मूल्यांकन शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र.जमीन-११/२००७/ प्र.क्र.९८/ज-१ दि.२९/०४/२००८ मधील आदेशानुसार टप्पा पध्दतीने र.रु.६३,१४,०००/- इतके होत आहे.

उपोद्घातांत अ.क्र. ५ कडे नमुद केलेल्या शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. जमीन०५/२०११/प्र.क्र.१०/ज-१ दि.२७/०७/२०११ नुसार बृहन्मुंबई महानगर पालिका वगळून अन्य नगरपालिका/ महानगरपालिका क्षेत्रात तसेच ग्रामीण क्षेत्रात विकास आराखडयात आरक्षित सार्वजनिक सुविधा व सार्वजनिक प्रयोजनाकरीता आरक्षित दिनांक ७/३/२००६ च्या शासन निर्णयामध्ये नमूद प्रयोजनांसाठी तसेच पुढील प्रयोजनांसाठी म्हणजे शासकीय दवाखाने, शासकीय शाळा/आश्रम शाळा, शासकीय महाविद्यालय, केंद्रीय विद्यालय,शासकीय वसतीगृह, प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक जमीन,पाणी पुरवठा योजना, सिंचन प्रकल्प (तलाव), शासकीय कार्यालयांच्या इमारती तथा जिल्हा परिषद मार्फत राबविण्यांत येत असलेल्या विविध लोकोपयोगी योजना/कार्यक्रम/प्रकल्प इत्यादी कामांकरिता निर्बाधरित्या वाटपास उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनींचा आगाऊ ताबा राज्य/केंद्र शासनाच्या विविध विभागांना व त्यांच्या योजनांसाठी जमिनीच्या किमान गरजेनुसार देण्याचे अधिकार पुढील अटीशर्तीनुसार अनुक्रमे जिल्हाधिकारी १ हेक्टर पर्यंत व १ हेक्टर पेक्षा जास्त मात्र ५ हेक्टर मर्यादेपर्यंत विभागीय आयुक्त यांना प्रत्यायोजित करण्यांत आले आहेत.शासन, महसूल व वन विभाग परिपत्रक दिनांक ३०/११/२०१२ मधील सुचनांनुसार राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागांना शासकीय जमिनींचा आगाऊ ताबा देताना, जमिनींची खरीखुरी आवश्यकता विचारात घेऊन, ती महसूल मुक्त व भोगवटामूल्यरहीत पध्दतीने देण्याबाबत सुचना आहेत.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,१९५८ मधील कलम ५१ (१) (१ अ) मध्ये अशी तरतूद आहे की, पंचायतीकडे निहित असलेली कोणतीही मालमत्ता ही कोणत्याही राष्ट्रीय किंवा राज्य विकास योजनेच्या प्रयोजनासाठी किंवा अन्य कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे असे राज्य सरकारचे मत असेल त्याबाबतीत किंवा अशी कोणतीही मालमत्ता ज्या प्रयोजनासाठी निहित करण्यात आली असेल त्या प्रयोजनासाठी पंचायतीस तिची आवश्यकता नसेल त्या बाबतीत, राज्य सरकारला अशी मालमत्ता परत घेता येईल आणि मालमत्ता अशा रितीने परत घेण्यात आल्यानंतर ती पंचायतीकडे निहित असण्याचे बंद होईल आणि ती राज्य सरकारकडे पुन्हा निहित होईल.

उपोद्घातांत अ.क्र. ७ कडे नमुद केलेल्या दिनांक ०२/०१/२०१४ च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद यांनी असे अभिप्राय दिले आहेत की, शासन परिपत्रक दिनांक

(पान ३ वर)

२८/०५/२०१० नुसार सर्वांगीण विकासाच्या दृष्टिने मुलभूत नागरी सुविधा उदा. पाणी पुरवठा , दुरसंचार, दवाखाने, शाळा बांधकाम, उर्जा पुरवठा इत्यादी पयोजनाकरीता जमिनीची आवश्यकता असेल आणि त्या ठिकाणी अशी शासकिय जमीन उपलब्ध नसेल अथवा ज्या प्रयोजनासाठी जमिनीची आवश्यकता आहे, त्या प्रयोजनासाठी अशी कोणतीही जमीन उपयुक्त नसेल तर अशा प्रकरणी प्रस्तुत प्रयोजनासाठी लागवडी खालील क्षेत्राच्या किमान ५ % गायरान जमिनीबाबतच्या अटी शिथील करुन ती जमीन उपलब्ध करुन देता येते. सदर शासन परिपत्रक दिनांक २८/६/१९९९ व दिनांक २८/५/२०१० नुसार अशी जमीन देतांना संबधीत ग्राम सभेने व ग्राम पंचायतीने तसा सुस्पष्ट उल्लेख करुन ठराव मंजूर करणे आवश्यक आहे. व त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद रायगड यांची शिफारस असणे आवश्यक आहे. जिल्हा चिकित्सक रायगड अलिबाग, यांच्याकडून मागणी केलेप्रमाणे उपविभागीय अधिकारी माणगांव, यांनी मौजे तळे, ता.तळा येथील ग.नं.८६२,८६४,८६५ व ८६६ एकूण क्षेत्र १.१७.०० हे.आर शासकीय ग्रामिण रुग्णालय तळासाठी शासकिय जागा मंजूर मिळणेबाबत केलेल्या विनंतीनुसार तसेच ग्रामपंचायत तळे ग्रामसभा दिनांक ०२/१०/२०१३ मधील ठराव क्र.२५८/८ चे मौजे तळा, ता.तळा,जि.रायगड येथील स.नं.८६२,८६४,८६५ व ८६६ एकूण क्षेत्र १.१७.०० हे.आर जमीन ग्रामसभेच्या ठरावानुसार परंपरागत स्मशानभुमीसाठी ५ गुंठे जागा राखीव ठेवून ग्रामीण रुग्णालय तळा करिता देण्यास हरकत नाही.

वरील परिस्थिती विचारात घेऊन जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड अलिबाग यांनी १ हेक्टर जमिनीचा आगाऊ ताबा मिळण्याची विनंती केली असल्याने शासन निर्णय महसूल व वन विभाग दिनांक २७/०७/२०११ मधील आदेशानुसार उपविभागीय अधिकारी माणगांव यांनी प्रस्तावित केलेल्या खालीलप्रमाणे जमिनीपैकी पुढीलप्रमाणे १ हेक्टर जमीन प्रथम मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,१९५८ मधील कलम ५१ (१) (१ अ) मधील तरतूदीनुसार ग्रामपंचायतीकडून काढून घेऊन त्या जमिनीचा आगाऊ ताबा सार्वजनिक आरोग्य विभागाकडे शासनाचे जमीन मंजूरीच्या अंतीम मान्यतेस अधीन राहून आणि पुढे नमुद केलेल्या अटी व शर्तीवर देण्याचे आदेश देत आहे.

| गांव व तालुका | ग.नं. | ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र (हे.आर) | ७/१२ वरील नोंद | आगाऊ ताबा दयावयाचे क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|---|
| तळा, ता.तळा, जि.रायगड. | ८६२ | ०.३९.० | ग्रा.पं.तळे (मार्ग) | ०.२७.० |
| | ८६४ | ०.१९.० | ग्रा.पं.तळे (गुराचे गोटर्ण) | ०.१९.० |
| | ८६५ | ०.५४.० | ग्रा.पं.तळे (मसणवटा) | ०.४९.० |
| | ८६६ | ०.०५.० | ग्रा.पं.तळे (मार्ग) | ०.०५.० |
| एकूण | | १.१७.०० | | १.००.०० |

<u>अटी व शर्ती</u>

१) आगाऊ ताबा दिलेल्या जमिनीचे संरक्षण करणे, देखभाल करण्याची जबाबदारी सार्वजनिक आरोग्य विभागाची राहील.

२) जागेचा वापर दिलेल्या प्रयोजनासाठीच करावयाचा असून, शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय प्रयोजनात कोणताही बदल अथवा हस्तांतरण करता येणार नाही.

३) सदर जमिनीत कोणत्याही प्रकारची अतिक्रमणे होणार नाहीत याची सार्वजनिक आरोग्य विभागाची राहील.

४) जमिनीचा आगाऊ ताबा घेतल्यानंतर उप अधीक्षक, भूमी अभिलेख तळा यांच्याकडून मोजणी करुन घ्यावी.

५) जमिनीचा वापर मंजूर प्रयोजनार्थ करण्यासाठी आवश्यक त्या परवानग्या सर्व संबंधीत विभागाकडून घेण्याची जबाबदारी सार्वजनिक आरोग्य विभागाची राहील.

६) सदर जमिनीची सार्वजनिक आरोग्य विभागास आवश्यकता नसल्यास ती जमीन पुन्हा महसूल विभागाकडे हस्तांतरीत करावी.

(कृ.पु.पा.)

७) ग्रामिण रुग्णालय अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक ०.५० च्या मर्यादेत अनुज्ञेय होईल.

८) वरीलपैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग झाल्यास सदरची जमीन सार्वजनिक आरोग्य विभागाकडून काढून घेवून शासनजमा करण्यांत येईल.

सही/-
(प्रविण शिंदे)
अपर जिल्हाधिकारी रायगड

प्रत :- जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड-अलिबाग यांना माहितीसाठी.

प्रत :- उपविभागीय अधिकारी माणगाव, उपविभाग माणगाव यांना माहिती व पुढील आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीसाठी.

प्रत :- तहसिलदार तळा यांना माहिती व आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीसाठी.
२/- त्यांनी वरील आदेशाचा तात्काळ अंमल देवून ताबा पावती, ताबा दिलेल्या जमिनीचा नकाशा, अंमल देण्यात आलेला ७/१२ उतारा व फेरफार उतारा या कार्यालयाकडे त्वरीत सादर करावा.

प्रत :-उप अधीक्षक, भूमी अभिलेख तळा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत :-मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग कोकण भवन नवी मुंबई-४०० ६१४ यांना माहितीसाठी सादर.

प्रत :- मा.अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत :- आदेश संचिकेसाठी.

अपर जिल्हाधिकारी रायगड करिता

वाचा

१)महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ तर्फे भाडेपट्टाधारक मेसर्स कॅल्साईट प्रॉपर्टीज डेव्हलपर्स प्रा.लि.तर्फे डायरेक्टर शाहरुख फिरोज मेहता वगैरे ३ रा.सीजे हाऊस ६ वा माळा, डॉ.ॲनि बेझंट रोड, शिवसागर इस्टेट, वरळी मुंबई ४००० ०१८. यांचा अर्ज दि. ७/१०/२००९ व दि.१८/४/२०१३.

२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांजकडील पत्र क्र. MTDC/PER/२००९ दि.२३/०९/२००९, दि.२३/०४/२०१० व दि.१५/०९/२०११.

३) या कार्यालयाकडील आदेश क्रमांक आरबी/अेलअेनडी/६१७६२/अ-२/प्र.क्र.७१९ दि.१७/६/१९९३.

४) शासन,गृह विभाग (पर्यटन)यांचेकडील निर्णय क्र. एमटीसी-०३९९/प्र.क्र.२०१/पर्यटन,दि.७/०४/१९९९

५) शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र.एनएए-१००७/प्र.क्र.३८/ल-५, दि.१६/१२/२०११

६) कार्यकारी अभियंता (बांधकाम) रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांजकडील पत्र क्र.राजिप/बांख्रा/ सीबी-१/६८६/२०१० दि.२९/०१/२०१०.

७) सहाय्यक संचालक,नगर रचना,रायगड अलिबाग यांजकडील पत्र जा.क्र.ससंनर-राअ/बिशेप/मौजे नागांव/ता.अलिबाग/ग.क्र.१४५२/२ व इतर/२६३५ दि.१८/०६/२०१३.

८)मेंबर सेक्रेटरी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांजकडील पत्र क्र. Formant/१.० Bo/ROHQ/CE/CAC-५९८६,दि.१७/७/२०१३

९) संचालक,पर्यावरण व वन मंत्रालय,नवी दिल्ली यांचेकडील पत्र क्र. F No.II-६२/२०१०IA-III दि.२६/१२/२०१२

१०)जिल्हा आरोग्य अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांजकडील पत्र जा.क्र.राजिप/आरोग्य/ एनएसईपी/१६२६/१०,दि.२७/१/२०१०वजा.क्र.राजिप/आरोग्य/एनएसईपी/२५९६/२०१३ दि.२/५/ २०१३.

११) तहसिलदार अलिबाग यांजकडील पत्र ५/०१/२०१०, दि.२४/०५/२०१३,दि.२१/८/२०१३ व पत्रक्र. एलएनडी/ कात-१/ ३१०७/१३, आदेश दि.१०/१०/२०१३ व दि.७/९/२०१३.व पत्र दि.३/१/२०१४

१२) या कार्यालयाकडील मंजूर टिपणी दिनांक १८/०१/२०१४.

---

क्र.मशा/जमीन/अ-६/१९३९२०/टो.नं.१२२०/०९
जिल्हाधिकारी रायगड यांचे कार्यालय
अलिबाग दिनांक :- २१/०१/२०१४.

आदेश

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ तर्फे भाडेपट्टाधारक मेसर्स कॅल्साईट प्रॉपर्टीज डेव्हलपर्स प्रा.लि.तर्फे डायरेक्टर शाहरुख फिरोज मेहता वगैरे ३ रा.मुंबई यांनी मौजे नागांव तालुका अलिबाग येथील ग.नं.१४५२ हि.नं.२ क्षेत्र ७१.०४.१० हे.आर पैकी ६८.८३.०० हे.आर व ग.नं.२४४४ क्षेत्र १३.००.०० हे.आर पैकी ५.८१.०० हे.आर. या जागेत इको टुरिझम वसाहत व बिच रिसॉर्ट या कारणासाठी (वाणिज्य) बिनशेती व बांधकाम परवानगी मिळणेबाबत दि.७/१०/२००९ व दि.१८/४/२०१३ रोजी अर्ज केलेला आहे.

मौजे नागांव, ता.अलिबाग येथील स.नं.२८५/१अ क्षेत्र ७८-६३-३ हे.आर.पैकी ७५-६०-१५ हे.आर. ही सरकारी गुरचरण जमीन मुख्य कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांना या कार्यालयाकडील आदेश क्रमांक आरबी/अेलअेनडी/६१७६२/अ-२/प्र.क्र.७१९ दि.१७/०६/१९९३ अन्वये भाडेपट्टयाने देण्यात आलेली आहे.

मा.आयुक्त मुंबई विभाग, यांचेकडील अधिसूचना क्र.ए.डी.एम.४२५० ता.३१/१/ १९७६ अन्वये मौजे नागांव, ता.अलिबाग या गावचे स्वतंत्र महसूली गावात रुपांतरण करण्यांत आल्यामुळे त्याप्रमाणे नवीन आकारबंद आले वरुन गांव कागदी जुना स.नं.२८५ चा नवीन स.नं.२९४ असा झालेला असून त्याबाबत फेरफार क्र. १८७२९ दि. ४/११/१९९० अन्वये दुरुस्ती करण्यात आली आहे. तसेच फेरफार क्र.२०९८ दि. ०३/०९/२०१० अन्वये असे दिसून येते की, जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, रायगड-अलिबाग यांचेकडील पत्र क्र.एकत्री/एस.आर./५ नागांव/अलिबाग/२०१०/१९२२ दि.०५/०८/२०१० व उप अधिक्षक, भूमी अभिलेख, अलिबाग यांचेकडील पत्र क्र.१६५३ क्र.एकत्री/त. अर्ज/नागांव/एसआर-३१२/२०१०, दि.९/०८/२०१० नुसार शुध्दीपत्राप्रमाणे गट नं. २४४४ (२९४/१)